महाराष्ट्र पोलीस

# पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यालय.

साधु वासवानी चौक, जी.पी.ओ. शेजारी, पुणे - ४११ ००८

दुरध्वनी क्रमांक ०२०-२६२०८३२५, फॅक्स क्रमांक ०२०-२६१२८१०५

ई-मेल :- 1. crimecomp.pune@nic.in 2. cp.pune@nic.in


## पोलीस नोटीसद्वारे

-: प्रे स नो ट :-

२०१७

दिवाळी सणानिमित्त दरवर्षी तात्पुरते फटाके विक्री परवाने या कार्यालयाकडून देण्यात येतात. फटाके विक्री करतेवेळी व फटाके वाजवितेवेळी कोणताही धोका अथवा अपघात होऊ नये यासाठी कायद्यामध्ये खालीलप्रमाणे तरतुद असुन त्याप्रमाणे नागरीकांनी त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

१. महाराष्ट्र शस्त्र अधिनियम (१५४) (३) अन्वये सरकारने कागदात स्फोटक पदार्थ ठेवलेले व त्याभोवती ४२.५३४ ग्रॅम वजनाचा ५.७१५ सेंटीमिटर लांबीचा व ३.१७५ सेंटीमिटर व्यासाचा दो-याने गुंडाळलेला ॲटमबॉम्ब म्हणून ओळखल्या जाणा-या फटाक्यांच्या उत्पादनावर जवळ बाळगणा-यावर आणि विक्रीवर निर्बंध घालण्यात आले आहेत.

२. फटाके परवाने दि.२२/०९/२०१७ पासून दि.२२/१०/२०१७ पर्यन्त या कालावधीसाठीच देण्यात येणार आहेत. मुदत संपल्यानंतर फटाके अथवा शोभेची दारू यांची विक्री करता येणार नाही. तसेच शिल्लक राहिलेले फटाके अथवा साठा हा परवाना असलेल्या गोदामामध्ये किंवा घाऊक परवाना धारण करणा-याकडे परत करणे आवश्यक आहे.

३. पोलीस आयुक्तालयाचे परिक्षेत्रामध्ये कोणत्याही रस्त्यात किंवा रस्त्यांपासून १० मीटर अंतराचे आत मुंबई पोलीस अधिनियम १९५१ पोट कलम ३३ ' यु ' मधील तरतुदी नुसार कोणत्याही प्रकारची शोभेची दारू अगर कोणत्याही नावाने ओळखले जाणारे फटाके फेकणे, सोडणे, उडविणे, अगर फायर बलून किंवा अग्निबाण उडविणे ही कृत्ये करण्यास मनाई आहे. सदर कलम २ चे पोट कलम १५ अन्वये रस्त्यांत कोणत्याही महामार्ग/पूल/सेतू मार्गावर नेमलेले मार्ग, सेतू कमानीवजा घाट, धक्का किंवा कोणतीही आळी किंवा वाट मग ती रहदारीची असो अथवा नसो याचा समावेश होतो. या आदेशाचे उल्लंघन जी व्यक्ती करेल ती वरील कायदयान्वये (कलम १३१ (ए) सह (i)) कायदेशीर कारवाईस पात्र ठरेल.

४. मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिका क्रमांक ७२/१९९८ मध्ये दिनांक २७.९.२००१ रोजी सुनावणीच्या दरम्यान दसरा, दिवाळी, व इतर सणांच्या वेळी मोठया आवाजाचे फटाके उडविल्यामुळे निर्माण होणारे ध्वनी व हवा प्रदुषणाचे जनतेवर होणारे संभाव्य अपायकारक परिणाम टाळण्यासाठी असे फटाके वाजविण्यावर निर्बंध घालणे बाबत अंतरिम आदेश दिलेले आहेत. त्या नुसार व सर्वोच्च न्यायालयाचे ध्वनी प्रदुषणाबाबतचे निर्देश दि.१८/०७/०५ नुसार.

अ. केंद्र शासन, केंद्र शासित प्रदेश आणि राज्य शासन यांनी भारत सरकारच्या राजपत्र क्रमांक जीएसआर/६८२-ई दिनांक ५.१०.९९ नुसार प्रकाशित केलेल्या पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ अंतर्गत पर्यावरण (संरक्षण) नियमातील तरतूदीची मुख्यत्वे करून या नियमातील सुधारित नियम ८९ ची ज्या फटाक्यांच्या आवाजांच्या मानंका बाबत आहेत त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. त्यानुसार,

१. एखादा फटाका उडविण्याच्या जागेपासून ४ मीटर अंतरावर १२५ डेसीबल आवाज निर्माण करणा-या फटाक्यांचे उत्पादन, विक्री व वापर यावर बंदी घालण्यात येत आहे.

२. जर साखळी फटाका ५० ते १०० तसेच १०० व त्यावरील फटाके असतील तर आवाजाची मर्यादा फटाका उडविण्याच्या जागेपासून ४ मीटर अंतरापर्यंत अनुक्रमें ११५/११० व १०५ डेसीबल एवढी असावी. यापेक्षा जास्त आवाज निर्माण करणा-या तसेच १०० पेक्षा जास्त फटाके असलेल्या सर्व साखळी फटाका उत्पादन, विक्री व वापर यावर बंदी घालण्यात येत आहे.

ब.) ध्वनी निर्माण करुन आवाजाचे प्रदुषण करणा-या फटाक्यांवर रात्री १०.०० ते सकाळी ०६.०० वाजेपर्यंत संपूर्ण बंदी घालण्यांत येत आहे. परंतु जे फटाके विविध रंग निर्माण करतात किंवा सोडतात किंवा आवाज करित नाहीत अश्या फटाक्यांवर निर्बध घालण्याची आवश्यकता नाही.

क.) शांतता प्रभागात कोणत्याही फटाक्याचा वापर कुठल्याही वेळेत करण्यात येऊ नये. शांतता प्रभागामध्ये रूग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये यांच्या सभोवतालचे १०० मीटर पर्यंतचे क्षेत्र येते.

५. पेट्रोलियम तथा विस्फोटक सुरक्षा संघटन, नागपूर यांचेकडील परिपत्रक क्र.आर-४(२) १८३/सी.सी.१९४/२०१५, दि.१५/१२/२०१५ अन्वये **परवानाधारक यांनी विदेशी मूळ फटाके विक्री करू नये** अशा सूचना दिलेल्या आहेत.

६. मुंबई पोलीस अधिनियम १९५१ कलम ३३ मधील अधिकारान्वये खालील फटाके विक्रीचे ठिकाणी ५० मिटरचे परिसरात वाहने पार्किंगसाठी निर्बंध घालण्यात आले आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. म्हात्रे पुल | २. हडपसर | ३. पिंपरी | ४. गोळीबार मैदान | |
| ५. कासारवाडी | ६. चिंचवड | ७. खडकी बाजार | ८. निगडी | ९. विश्रांतवाडी |

७. ज्या ठिकाणी तात्पुरत्या फटाका स्टॉलकरिता परवानगी देण्यात आली आहे त्या ठिकाणी ५० मिटरच्या परिसरात संयुक्त नियंत्रक, विस्फोटके, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक जीएसआर – ६८७ (इ) दि. २७-९-१९८४ मधील परि. क्र. ५ अन्वये फटाक्यांची आतिषबाजी करण्यावर निर्बंध घालण्यात आलेले आहेत.

तरी, वरील नियमाचे काटेकोरपणे पालन करून कोणताही अपघात अथवा धोका होणार नाही याबाबत कृपया नागरिकांनी दक्षता घ्यावी.